## बाकी आयुष्य....

सखे...
माहितीये गं,

कधी-कधी नको वाटते
हे खडतर जिणे..
हसु ओठांवर आणत दु:खं
आतल्या आत पिणे !

सगळंच कसं अगदी
अंगावर आल्यासारखं...
संकटांचे डोंगर फक्तं..
सुख मात्र हुकल्यासारखं..

बाकी बरंच काही आयुष्यात
मिळणार किंवा नाही ?
पण आयुष्य अजून बाकी आहे
हे सुध्दा कमी नाही !

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**